दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www. sahyandrinews.com
Scan QR code to visit... Epaper Portal
Scan QR code to visit... Epaper Portal
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक २०१ • Title - Code :- MAHMAR49513 • शुक्रवार दि.२६ एप्रिल २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# मी तुमच्या शेतातील म्हसोबा:मतदानाच्या माध्यमांतून पाच वर्षातून एकदा मलाही परडी सोडा-राजू शेट्टी




**कोल्हापूर (वृत्तसंस्था)**–मी तुमच्या उसाच्या शेतातील म्हसोबा आहे. म्हसोबाला वर्षाला परडी सोडता तशी परडी मला पाच वर्षातून एकदा मतदानाच्या माध्यमांतून सोडा असे भावनिक आवाहन स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांनी केले आहे. हातकणंगले लोकसभा मतदारसंघामधून राजू शेट्टी निवडणूक लढवत आहेत. यासाठी त्यांनी प्रचाराला सुरुवात केली आहे. सभेत त्यांनी केलेल्या या विधानाची आता जोरदार चर्चा रंगली आहे.

यावेळी राजू शेट्टी म्हणाले, ''पुढची दहा दिवस तुम्ही प्रचार करा, आपल्याला विजयी व्हायचे आहे. कुणालाही अंगावर घेण्याची तयारी आतापर्यंत आपण घेतली आहे. तुमचा आणि आमचा एकच करार आहे. तुम्हाला माहिती आहे का, तुमच्या प्रत्येकाच्या शेतामध्ये म्हसोबा आहे. म्हसोबा काय करतो, तर आपल्या शेताची राखण करतो. मग राखण केल्याबद्दल आपण वर्षांतून एकदा त्याला परडी सोडतो. जर परडी सोडली नाही तर म्हसोबा कोपतो. प्रत्येकजण कृतज्ञता म्हणून परडी सोडत असतो. मी सुद्धा तुमच्या उसाच्या शेतातील म्हसोबा आहे हे लक्षात ठेवा'', असे राजू शेट्टी मतदारांना संबोधित करताना म्हणाले.पुढे राजू शेट्टी म्हणाले, ''तुमच्या उसाचे राखण कोण करत आहे. मीच करतो ना. तुमच्या उसाचं, तुमच्या दुधाचं, तुमच्या गोठ्यातील जनावरांचं राखण करणारा मी म्हसोबा आहे. मग त्या म्हसोबाला वर्षाला परडी सोडता, मला पाच वर्षातून एकदा तरी परडी सोडा की. पाच वर्षातून एकदा परडी सोडायचे म्हणजे मला मत द्यायचे'', अशी भावनिक साद राजू शेट्टी यांनी घातली आहे.याशिवाय ''ते मत नंतर तुम्हालाच उपयोगाला येणार आहे. त्या मताचा उपयोग तुम्हाला होणार आहे. त्यामुळे तुमच्या उसाचा प्रश्न, दुधाचा प्रश्न, विद्यार्थ्यांचा प्रश्न, गोरगरीबांचा प्रश्न निवडून आल्यानंतर आपल्याला मार्गी लावता येतील. सामान्य माणसांचा आवाज संसदेपर्यंत पोहोचणार आहे. त्या संसदेला बोलायला लावायचे असेल तर तगडा माणूस संसदेपर्यंत जाणे गरजेचे आहे'', असे राजू शेट्टी म्हणाले.दरम्यान, राजू शेट्टी यांच्या विरोधात विद्यमान खासदार धैर्यशील माने, ठाकरे सेनेचे माजी आमदार सत्यजित पाटील व वंचितचे दादासाहेब चवगोंडा पाटील हे प्रमुख तीन उमेदवार आहेत. त्यामुळे हातकंणगलेमध्ये यंदा चौरंगी लढत होणार आहे.

# कारमपल्ली–टेकला जंगल परिसरात हत्तीचे दर्शन

**भामरागड । प्रतिनिधी**

भामरागड तालुक्यातील कारमपल्ली – टेकला या जंगल परिसरात हत्तीचे दर्शन झाल्याने सध्या या परिसरात भितीचे वातावरण निर्माण झाला आहे. प्राप्त माहितीनुसार सदर हत्ती आज पहाटे कोसफुंडी या परिसरातील नागरिकांना दिसला आणि त्यानंतर परत कारमपल्ली – टेकला परिसरातील नागरिकांच्या निदर्शनास आला. महत्वाचा म्हणजे आता तालुक्यातील आदिवासी बांधव बांबू कटाईच्या कामात लागले आहे त्यामुळे जवळपास संपूर्ण कुटुंबातील सदस्य पहाटेच उठून संपूर्ण दिवसाचे खाण्यापिण्याचा साहित्यसह जंगलात जातात आणि दिवसभर बांबू कटाई करतात त्यामुळे नित्य नियमाप्रमाणे आजही कारमप्पल्ली – टेकला परिसरातील नागरिक आपल्या कुटूंबियांसाह बांबू कटाई करिता जातं असतांना अचानक त्यांना हत्तीचे दर्शन झाल्याने गावातील सर्व नागरिक घरी परतले त्यामुळे या परिसरात सध्या भितीचे वातावरण पसरले आहे.



आम्हाला याची माहिती मिळाली आहे व आमच्या पूर्ण चमू आता त्या हत्तीचा शोध मोहीमकरिता निघणार आहोत.

**रामभाऊ चौधरी**
**वनपाल, हेमलकसा क्षेत्र.**

# मतदानाचा सेल्फी, रिल्स्, पोस्टर्स, मिम्स् स्पर्धेचा निकाल जाहीर

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक – २०२४ अंतर्गत चंद्रपूर लोकसभा मतदारसंघाच्या निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्या वतीने मतदान केल्याचा सेल्फी, रिल्स्, पोस्टर्स आणि मिम्स् स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेला नागरिकांनी उत्स्फुर्त प्रतिसाद देऊन मतदानाची टक्केवारी वाढविण्यात सहकार्य केले. या स्पर्धांचा निकाल जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. आणि मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन यांच्या उपस्थितीत लकी ड्रॉ च्या माध्यमातून नुकताच घोषित करण्यात आला आहे.

सन २०१९ च्या निवडणुकीत मतदानाची टक्केवारी कमी असल्यामुळे यावर्षी २०२४ मध्ये मतदारांमध्ये मतदानाचा उत्साह निर्माण व्हावा, लोकशाही प्रक्रियेत सहभाग नोंदवून मतदानाची टक्केवारी वाढावी, या उद्देशाने स्वीप अंतर्गत जिल्हा प्रशासनाने वेगवेगळे उपक्रम राबविले. तरुण मतदारांमध्ये रिल्स्, पोस्टर्स, मिम्स् बाबत असलेली प्रचंड उत्सुकता पाहता जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी यांनी 'माय व्होट इज माय फ्युचर, पॉवर ऑफ वन व्होट' या थीमवर रिल्स्, पोस्टर्स, मिम्स् तयार करून जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळा वरून अपलोड करणे, तसेच 'तुमचे मत द्या आणि आकर्षक बक्षीसे जिंका' या थीमवर आधारीत मतदान केल्यानंतर शाई लावलेले बोट दाखवत मतदान केंद्रासमोर सेल्फी क्लिक करून फोटो अपलोड करण्याबाबत स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.या स्पर्धेचा निकाल जाहीर करण्यात आला असून विजेत्या स्पर्धकांना जिल्हाधिकारी यांच्या हस्ते पुढील आठवड्यात नियोजन भवन येथे पारितोषिक वितरीत करण्यात येणार आहे. स्पर्धेचा लकी ड्रा काढतांना जिल्हाधिकारी कार्यालय येथे उपवनसंरक्षक श्वेता बोड्डू, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य) श्याम वाखर्डे व इतर अधिकारी उपस्थित होते.

हे आहेत स्पर्धेतील विजेते मतदार : मतदान केंद्रासमोर सेल्फी क्लिक करणे

या स्पर्धेचे प्रथम पारितोषिक (अपाची मोटरसायकल) सुरेंद्र देवराव पोहाणे, रा. तुकुम चंद्रपूर यांना, द्वितीय पारितोषिक (रेसींग सायकल) प्रशांत मधुकर गेडाम, रा. मूल यांना तर तृतीय पारितोषिक (न्ड्रॉईड मोबाईल) अशोक ऋषी बारसागडे, रा. चंद्रपूर यांना लकी ड्रॉ च्या माध्यमातून घोषित करण्यात आले आहे.

रिल्स् स्पर्धा : प्रथम पारितोषिक (१५ हजार रुपये) आशिष बोबडे, रा. टिळक वॉर्ड, बालाजी मंदीरजवळ, चिमूर यांना, द्वितीय पारितोषिक (१० हजार रुपये) मंगेश साखरकर, रा. पालगाव, पो. आवाळपूर, ता. कोरपना यांना, तृतीय पारितोषिक (५ हजार रुपये) कोमील ज्ञानेश्वर मडावी, रा. वॉटर सप्लाय कॉर्टर, गोपालनगर, तुकुम, चंद्रपूर यांना लकी ड्रॉ च्या माध्यमातून घोषित करण्यात आले आहे.

पोस्टर्स स्पर्धा : प्रथम पारितोषिक (५ हजार रुपये) प्रथमेश यशवंत निकोडे, रा. नेहरू नगर, नवीन वस्ती, डीआरसी रोड, चंद्रपूर यांना, द्वितीय पारितोषिक (३ हजार रुपये) आचल राजू धोगडे, रा. शासकीय कन्या वसतीगृह, भिवकुंड (विसापूर) यांना, तृतीय पारितोषिक (२ हजार रुपये) वैष्णवी राजू मिलमिले, रा. तिलक वॉर्ड, बोर्डा, ता. वरोरा यांना लकी ड्रॉ च्या माध्यमातून घोषित करण्यात आले आहे.

मिम्स् स्पर्धा : प्रथम पारितोषिक (५ हजार रुपये) येवन संतोष येलमुले, रा. सुब्बई, ता. राजुरा यांना, द्वितीय पारितोषिक (३ हजार रुपये) संजय बाबुराव सोनुने, रा. हुडको कॉलनी, अमर चौक, चंद्रपूर यांना, तृतीय पारितोषिक (२ हजार रुपये) अनुप रंगलाल शाहा, रा. मच्छीनाला, मुक्तीकॉलनी, चंद्रपूर यांना लकी ड्रॉ च्या माध्यमातून घोषित करण्यात आले आहे.

# क्रांतीसुर्य महात्मा फुलेंच्या पुतळ्याची विटंबना करणाऱ्या समाजकंटकांना अटक करा

**मुल । प्रतिनिधी**

ज्या महापुरुषांच्या विचारानेच देशाची लोकशाही टिकली आहेअशाच महात्म्यांच्या पुतळ्याची विटंबना केली जात आहे. २१ एप्रिल रोजी यवतमाळ येथे महात्मा ज्योतिबा फुलेंच्या पुतळ्यांची शाई फेकून विटंबना केली. त्याचा शोध घेऊन त्या समाज कंटकांना अटक करावी अशी मागणी निवेदनाद्वारे उपविभागीय अधिकारी मूल यांचेकडे समाज संघटनेच्या विविध पदाधिकाऱ्यांनी केली आहे.



माळी महासंघ,समता परिषद, अखिल भारतीय माळी महासंघ, सावित्रीबाई फुले विकास संस्था, समजोत्थाण मंडळ, महिलागट, ओबीसी व बहुजन समाजाच्या वतीने गांधी चौक मुल येथे दिनांक २५ एप्रिल ला सकाळी ११ वाजता निषेध करुन निवेदन देण्यात आले.

निवेदन देताना माजी जिल्हा परिषद सदस्य प्रा. रामभाऊ महाडोळे, समता परिषदेचे जिल्हा अध्यक्ष प्रा.विजय लोनबले, माजी प्राचार्य बंडू गुरनुले, डॉ.राकेश गावतुरे, माळी महासंघाचे विभागीय महासचिव गुरु गुरनुले, डॉ. पद्माकर लेंनगुरे, माजी न.प.उपाध्यक्ष चंदू चटारे,माजी न. प.उपाध्यक्ष प्रविण मोहुर्ले, भाजपा युवा अध्यक्ष राकेश ठाकरे, प्रा.सुधीर नागोशे, दिपक वाढई, समता परिषदेच्या जिल्हा कार्याध्यक्ष शशिकला गावतूरे, केमदेव मोहुर्ले, सामाजिक कार्यकर्ते हसन वाढई,सरपंच नितीन गुरनूले, विवेक मांदाडे,ओमदेव मोहूर्ले, राकेश मोहूर्ले, आनंद गोंगले, अरुण ढोले, सचिन पुल्लावार, चित्तरंजन वाढई, बाळकृष्ण निकोडे, बालाजी लेंनगूरे, रवी खोब्रागडे, मंगेश शेंडे, सचिन आंबेकर, निखिल वाढई, सत्यवान मोहूर्ले, सुनील कावळे, देवराव गुरनुले,राकेश पुनावार, रेखा चौधरी, शामला बेलसरे, पपिता मांदाडे, जयश्री कावळे, सीमा लोनबले, प्रेमिला शेंडे,प्रदीप वाढई,परशुराम शेंडे,रामदास गुरनुले,श्रीरंग नागोशे, नामदेव वाढई, उमेश ढोले यांचेसह अनेक बहुजन समाज बांधव उपस्थित होते.

# वादळी पावसामुळे घरांची पडझड झालेल्या कुटुंबांना यंग चांदा ब्रिगेडच्या वतीने आर्थिक मदत

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

दोन दिवसांपुर्वी चंद्रपूरात सुसाट्याच्या वा-यासह झालेल्या पावसामुळे अनेकांच्या घरांची पडझड झाली आहे. अशा कुटुंबांना आमदार किशोर जोरगेवार यांच्या सुचनेनंतर यंग चांदा ब्रिगेडच्या वतीने आर्थिक मदत करण्यात आली आहे. यावेळी यंग चांदा ब्रिगेडच्या संघटिका सविता दंढारे, युवती प्रमुख भाग्यश्री हांडे, रुपा परसराम आदींची उपस्थिती होती.

महाराष्ट्राच्या अनेक भागात दोन दिवसांपूर्वी अवकाळी पावसाने हजेरी लावली होती. यावेळी सुसाट्याच्या वारा आणि विजगर्जनेसह जोरदार पावसाच्या सरी कोसळल्या. परिणामी शहरातील अनेक भागातील घरावरच्या टिना आणि कवेलू उडून गेले. तर अनेकांच्या घराच्या भिंती या पावसाने कोसळल्या. त्यामुळे अनेकांच्या घरातील विद्युत उपकरणे व धान्य खराब झाली असुन या कुटुंबांचे त्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. अशा काही नागरिकांनी



आमदार किशोर जोरगेवार यांच्या कडे मदत मागीतली असता पिडीत कुटुंबांना धान्य व आर्थिक मदत करण्याच्या सुचना आमदार किशोर जोरगेवार यांनी यंग चांदा ब्रिगेडच्या पदाधिका-यांना केल्या होत्या.

त्यानंतर यंग चांदा ब्रिगेडच्या पदाधिका-यांनी दत्त नगर येथील सोपान इंगळे, मंगला इंगळे, उत्तमराव गुजरकर, भारत इंगळे, पंचशील इंगळे, मयुर इंगळे रमाबाई नगर येथील तारा डोंगरे यासह अनेक नुकसान ग्रस्त नागरिकांच्या घरी भेट देत त्यांना धान्य व आर्थिक मतद केली आहे. तसेच शासनासतर्फे मिळणारी मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे म्हटले आहे. यंग चांदा ब्रिगेडची मदत मिळताच नागरिकांनी त्यांचे आभार मानले आहे.

# रानटी हत्तीच्या हल्ल्यात वृद्ध महिला गंभीर जखमी: दहशत, भीती आणि धावाधाव;भामरागड मध्ये चाललंय तरी काय ?

**गडचिरोली । प्रतिनिधी**

**मागील दोन दिवसापासून सिरोंचा, आलापल्ली वनविभागात धुमाकूळ घालणाऱ्या रानटी हत्तीने भामरागड वनविभागात प्रवेश करताच कियर येथील गोंगलु रामा तेलामी या (५३) वर्षीय इसमाला पायाखाली तुडवून ठार केले.तर याच तालुक्यातील हिदूर येथील वयोवृद्ध महिलेवर हल्ला करत जखमी केल्याची आणखी एक घटना समोर आली आहे.वंजे झुरु पुंगाटी (अंदाजे ६०) असे गंभीर जखमी झालेल्या महिलेचा नाव आहे.**





२५ एप्रिल रोजी दुपारच्या सुमारास गट्टा वनपरिक्षेत्रातील खंड क्रमांक ५२८ मध्ये त्या रानटी हत्तीने गोंगलू तेलामी वर हल्ला करून ठार केले. त्यांनतर रानटी हत्तीने पामुलगौतम नदी ओलांडून हिदूर गावाच्या जंगलात प्रवेश केला. त्या ठिकाणी देखील एका वयोवृद्ध महिलेवर हल्ला करत गंभीर जखमी केल्याची घटना उघडकीस आली आहे.या घटनेत ती वृद्ध महिला थोडक्यात बचावली असलेतरी या परिसरात रानटी हत्तीची एकच दहशत निर्माण झाली आहे.

प्राप्त माहितीनुसार हिदूर येथे लग्न समारंभ असल्याने येथील काही लोकं गावालगत असलेल्या माता मंदिरात गेले होते.पूजाअर्चा करून गावाकडे परत येत असताना पाठीमागून आलेल्या रानटी हत्तीने वंजे झुरु पुंगाटी नामक वृद्ध महिलेला दोनदा सोंडेने आपटले.या घटनेमुळे इतर लोकांनी त्या ठिकाणाहून पड काढला. रानटी हत्तीने त्या वयोवृद्ध महिलेला तिथेच सोडून अन्य लोकांचाही पाठलाग केला.त्याच क्षणी काही लोकांनी त्या आजीला त्या ठिकाणाहून उचलून गावात आणले. या घटनेत वयोवृद्ध महिला गंभीर जखमी झाली असून छातीत आणि कमरेत गंभीर जखम झाल्याचे सांगण्यात येत आहे. रात्रीची वेळ असल्याने त्या महिलेला सध्यातरी घरीच ठेवण्यात आले आहे.

सदर रानटी हत्ती हिदूर जंगल परिसरात असून आरेवाडा, कृषणार, भामरागड,हिता पहाडी, हिंदूर, मिरगुडवंचा,दोबुर,गुंडुरवाही या गावात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. वनविभागाची चमू या परिसरात दाखल झाले असून गावागावात जनजागृती करीत असल्याची माहिती काही नागरिकांनी दिली. मात्र हिदूर येथील वयोवृद्ध महिलेची अजूनही वनविभागाचे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी भेट घेतली नसल्याचे गावातील लोकांनी सांगितले.

# हिवरे बाजार येथे काल्याच्या कीर्तनाने श्री राम कथेची व अखंड हरीनाम सप्ताहाची सांगता

## जीवनात अध्यात्मिक गुरुशिवाय प्रगती अशक्य : शर्मा

**अहमदनगर । प्रतिनिधी**

जीवनात अनेक ग्रंथ आहेत, ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी आहे तुकोबांची गाथा आहे नाथांचं भागवत आहे रामायण आहे वाल्मीकीचं रामायण आहे. नाथांचे भागवत आहे. तुलसीदासजींचे रामायण आहे. सगळे ग्रंथ घरात आहेत सगळं आहे. सगळं आहे पण तुमच्या जीवनात अध्यात्मिक गुरुशिवाय तुमची प्रगती होत नाही असं प्रतिपादन हरिभक्त परायण समाधान महाराज शर्मा यांनी केले.नगर तालुक्यातील आदर्श गाव हिवरे बाजार येथे अयोध्येतील रामलला शीलांश स्थापनेनिमित्त श्रीराम नवमीच्या आदल्या दिवशी अष्टमी ते चैत्र शुद्ध पौर्णिमेच्या दिवशी येणाऱ्या हनुमान जयंती पर्यंत श्री राम कथा उत्सवाचे आयोजन करण्यात आलं होतं. या कथेचा समारोप सोमवारी झाला आणि मंगळवारी सकाळी सभा मंडपात हरिभक्त परायण समाधान महाराज शर्मा यांचे काल्याचे किर्तन झालं त्यावेळी ते बोलत होते.काल्याच्या कीर्तनात श्रीकृष्णाचं चरित्र मांडत असताना ते म्हणाले की माणसाला आयुष्यात प्रभू श्रीरामाप्रमाणे आचरण करण्याचे गुरु सांगतात पण श्रीकृष्णासारखं वागू नये असा दंडक आहे. कारण श्रीकृष्णाने आयुष्यात जे भोगलं ते दुःख इतर कुणीच भोगले नाही असं मला वाटतं नव्हे ते खरंच आहे. जीवनात अध्यात्मिक प्रगतीसाठी गुरु हा आवश्यकच आहे.






हे विशद करताना त्यांनी घरात पाण्याने भरून ठेवलेली घागर आणि त्यावर असलेली झाकण म्हणून ठेवलेली वाटी याचं उदाहरण त्यांनी दिल. घागर भरलेली असते. वाटी रिकामी असते. एकदा वाटीने घागरीकडे खंत व्यक्त केली की इतकी वर्ष मी तुझ्यासोबत आहे पण तू मला एक थेंब पण पाण्याचा टिपूस दिला नाही हे वाईट आहे. त्यावर घागर वाटेला म्हणाले की ज्याच्याकडून तुला काही हवं असेल त्याच्या डोक्यावर नाही तर त्याच्या पायापाशी बसले पाहिजे हे जीवनाचे सूत्र आहे. तुमच्या घराचा जेवढा प्लॉट आहे. तेवढं बांधकाम नाही. जेवढं बांधकाम आहे तेवढा दरवाजा नाही. जेवढा दरवाजा आहे तेवढी कडी नाही. जेवढी कडी आहे तेवढे कुलूप नाही. जेवढं मोठं कुलूप आहे तेवढी किल्ली नाही. आणि घर उघडण्यासाठी चावी ही लागतेच मग महत्त्व कोणाला आहे हे ओळखा.काल्याचे कीर्तनात समाधान महाराज शर्मा आणि पोपटराव पवार यांच्या हस्ते दहीहंडी फोडून काला गोळा करण्यात आला. तो प्रसाद म्हणून सर्वांना वाटण्यात आला.यावेळी या रामकथेसाठी आठ दिवस राहणाऱ्या सेवकांचा,सप्ताह कालखंडात गावातील ग्रामस्थांना मोफतपणे कीर्तनासाठी वाहतूक व्यवस्था करणारे तसेच वर्गणीव्यतिरिक्त स्वइच्छेने देणगी देणाऱ्या ग्रामस्थांचा, विविध सेवा देणाऱ्या सर्वांचा सत्कार करण्यात आला.पोपटराव पवार यांना अयोध्येत श्री राम लला मूर्ती स्थापनेसाठी विशेष निमंत्रण देण्यात आले होते. त्याची आठवण आणि पद्मश्री पुरस्कार याची क्षणचित्रे असलेलं घड्याळ सर्वांना भेट म्हणून देण्यात आल.

हा सत्कार झालेला सर्वांच्या घरी हे घड्याळ कायमस्वरूपी भिंतीवर दिसेल आणि या प्रसंगाची आठवण प्रत्येक वेळेला प्रत्येकाला होईल या उद्देशाला हे घड्याळ भेट देण्यात आला आहे .महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचे अधीक्षक अभियंता खांडेकर, कार्यकारी अभियंता लहामगे साहेब, उपकार्यकारी अभियंता झांजे , कक्ष अभियंता हिवरे बाजार चे साखरवडे, संभाजीनगर येथील जल सहयोग संस्थेचे पदाधिकारी आणि सदस्य , भानुदास तरटे, यांचा सत्कार करण्यात आला. महाप्रसाद वाटपाने कार्यक्रमाची सांगता झाली.हिवरे बाजार ग्रामविकास तरुण मंडळाने भरीव अशी मदत या सप्ताहाला दिली.

### केडगावकर नेहमीच विकास करणाऱ्यांच्या पाठीशी – सचिन कोतकर

# महायुतीचे उमेदवार डॉ.सुजय विखे यांच्या प्रचारार्थ दुचाकी रॅली

**अहमदनगर । प्रतिनिधी**

केडगावचे भाग्यविधाते भानुदास कोतकर, माजी महापौर संदीप कोतकर, उपमहापौर सुवर्णा कोतकर यांनी केडगाव व परिसराचा विकास केला. त्यामुळे केडगाव व आसपासचा झपाट्याने विकास झाला होऊन नागरी वसाहतींत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. केडगावची जनता नेहमी विकासकामे करणाऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहते, असे असे प्रतिपादन उद्योजक सचिन कोतकर यांनी केले.

महायुतीचे उमेदवार डॉ. सुजय विखे यांच्या प्रचारार्थ केडगाव येथील भैरवनाथ पतसंस्था येथून दुचाकी रॅली काढण्यात आली. यावेळी मनपाचे माजी सभापती मनोज कोतकर, भूषण गुंड, जालिंदर कोतकर, नीलेश सातपुते, बापू सातपुते, सागर सातपुते, गणेश सातपुते, पोपट कराळे, बच्चन कोतकर, अजित कोतकर, उमेश कोतकर आदींसह केडगाव पंचक्रोशीतील युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.श्री. कोतकर पुढे म्हणाले की, नगर दक्षिण लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे डॉ. सुजय विखे यांनी केडगावमध्ये



खासदारनिधीतून मोठी विकासकामे केली. त्यांनी येथील विकासात भर घातली. मोठे उपनगर म्हणून केडगावची वेगळी ओळख आहे. विकास कामे जो करील त्याच्या पाठीशी केडगावकर उभे असतात. त्यांनी केलेल्या विकासकामांची परतफेड म्हणून आम्ही सर्व केडगावकर मतदानाच्या माध्यमातून त्यांना दाखवून देऊ. त्यांना मोठ्या मताधिक्याने निवडून देऊ. असे ते म्हणाले. यावेळी मनोज कोतकर, जालिंदर कोतकर, नीलेश सातपुते यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

# केडगावमध्ये भगवान महावीर जन्मकल्याणकची रंगली शोभायात्रा

**अहमदनगर । प्रतिनिधी**

अहिंसा परमो धर्म:ची शिकवण देऊन संपूर्ण मानव जातीच्या कल्याणाचा उपदेश करणारे भगवान महावीर स्वामींचा जन्मकल्याणक (जयंती) केडगावमध्ये मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. गुरुदेव युवा मंचच्या वतीने केडगाव परिसरातून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. या शोभायात्रेत जे.एस.एस. गुरुकुलच्या विद्यार्थ्यांचे लेझीम पथक व सांस्कृतिक कार्यक्रमाने सर्वांचे लक्ष वेधले. शोभायात्रेत सनई, नगारा, चौघडा, बॅण्ड पथकासह डोक्यावर मंगल कलश घेतलेल्या मुली, विविध वेशभूषा परिधान केलेले लहान मुले-मुली, पांढरे शुभ्र वस्त्र परिधान केलेले पुरुष, केसरी, लाल साड्या परिधान केलेल्या महिला भगिनी मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. या शोभायात्रेचे चौका-चौकात स्वागत करण्यात आले. शोभा यात्रेच्या अग्रभागी भगवान महावीर स्वामींची प्रतिमा असलेले रथ होते. विद्यार्थ्यांच्या लेझीम पथकाने विविध डाव सादर करुन उपस्थितांची मने जिंकली. त्रिशलानंदन वीर की, जय बोलो महावीर की... अशा घोषणांनी परिसर दुमदुमला होता. भूषणनगर ताराबाग कॉलनी येथून शोभा यात्रेचे



प्रारंभ झाले. नगर-पुणे रोड मार्गे केडगाव बस स्थानक, अंबिका बस स्थानक येथून मार्गक्रमण होऊन पाच गोडाऊन जवळील केडगाव जैन धर्मस्थानक येथे शोभा यात्रेचा समारोप झाला. यावेळी साध्वी नवीन ज्योतीजी म.सा. यांनी भगवान महावीर यांच्या जीवनावर प्रकाश टाकला.कार्यक्रमास सचिन (आबा) कोतकर यांनी भेट देवून सर्व भाविकांना भगवान महावीर जयंतीच्या शुभेच्छा दिल्या व केडगाव जैन धर्मस्थानक परिसरात संदिप उद्योग समुहाच्या माध्यमातून पेव्हिंग ब्लॉग बसवून सुशोभिकरण करण्याचे आश्वासन दिले. मुलांनी नाटिकेतून भगवान महावीर यांनी मानव जातीच्या कल्याणासाठी दिलेली शिकवण सांगितली. महिलांनी स्वागत गीत सादर केले. यावेळी उपस्थितांनी आपले विचार मांडले. भाविकांसाठी गौतम प्रसादीचे नियोजन करण्यात आले होते.

# ध्येय धोरण आणि संकल्पांची सांगड म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी-डॉ.सुजय विखे पाटील



**राहुरी । प्रतिनिधी**

देशात सध्या मोदीजींची हमी सुरू असून देशातील जनतेचा त्यावर विश्वास आहे. ध्येय, धोरण आणि संकल्पांची सांगड म्हणजे पंतप्रधान नरेंद्र असे प्रतिपादन डॉ. सुजय विखे पाटील यांनी केले. ते राहूरी तालूक्यातील सोनगाव चौकातील कॉर्नर मिटींग मध्ये बोलत होते. यावेळी जिल्हा बँकेचे चेअरमन शिवाजीराव कर्डिले यांच्यासह स्थानिक कार्यकर्ते उपस्थित होते.

डॉ. सुजय विखे पाटील यांनी विरोधकांचा सडकून समाचार घेत विरोधकांकडे नेता म्हणून कोणताही चेहरा नाही. त्यांच्याकडे 'एक ना धड बारा भानगडी आहेत'. ते फक्त देशाला फक्त खड्ड्यातच घालू शकतात. यामुळे पंतप्रधान नरेंद्र हे देशाला एकमेव पर्याय आहेत असे डॉ. सुजय विखे पाटील म्हणाले. डॉ. सुजय विखे यांनी सांगितले की, सदरची निवडणूक ही देशाची प्रतिनिधित्व ठरवणारी निवडणूक आहे. येणाऱ्या काळात देश कुणाच्या हाती द्यायचा आहे हे जनतेला ठरवायचे आहे. देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या इतके प्रभावी नेतृत्व नाही आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाने मागील १० वर्षात जी प्रगती केली हे जगासमोर मोठे उदारण आहे. देशात संविधान मजबूत करण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे. लोकशाही अधिक सुदृढ आणि लोखाभिमुख करण्यासाठी देशाला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची देशाला गरज आहे.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे देशाला विकासासाच्या माध्यमातून जगात महासत्ता म्हणून पुढे आणायचे आहे. २०४७ च्या विकसित भारताची पायाभरणी करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हात बळकट करा आणि महायुतीच्या उमेदवाराला मोठ्या मताधिक्याने निवडून द्या असे त्यांनी आवाहन केले.

# नातवाला न्याय मिळवून देण्यासाठी पोलीस कुटुंबातील आजीचे उपोषण

**अहमदनगर । प्रतिनिधी**

२०२२ आणि २३ मध्ये झालेल्या पोलीस भरती अहमदनगर येथे भरती झालेल्या उमेदवाराचे मेडिकल फिटनेस साठी जे जे हॉस्पिटल येथे पाठवत नसल्याने तसेच सरकारी कर्मचारी व डॉक्टर यांच्यावर कोणतीही कारवाई होत नसल्याने नातवाला न्याय मिळवून देण्यासाठी सुलोचना गणपत केदारे व त्यांच्या नातवासह जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयाच्या बाहेर आमरण उपोषण करण्यास बसलेले आहेत.

सुलोचना केदारे यांचा मोठा नातू गणेश केदारे याने पोलीस अधीक्षक अहमदनगर येथील अस्थापना विभागातील कर्मचारी सोनवणे व त्यांच्या सहकार्यांबद्दल २०२१ पासून




आवाज उठवल्याबद्दल याचा राग मनात धरून अहमदनगर जिल्हा रुग्णालयातील कर्मचारी यांच्याशी संगनमताने मेडिकल फिटनेस साठी जे जे हॉस्पिटल येथे पाठवण्यात आले होते.तिथे पैशाची मागणी पूर्ण न केल्याने त्याला अन फिट असल्याचा कळविण्यात आले त्याचे आई आणि वडील पोलीस सेवा दलात नोकरी करीत असताना दोघेही मयत असल्याने नातेवाईकांकडून डॉक्टरांना पैसे देण्यासाठी हात उसणे घेतले असून तरी सुद्धा पोलीस अधीक्षक सुलोचना केदारे यांचा लहान नातू विक्रम केदारे याला पुन्हा मेडिकल साठी पाठवण्यात यावे.तसे नसेल तर २०२२ आणि २३ मध्ये अहमदनगर येथे पोलीस भरती झालेल्या उमेदवारांची री मेडिकल जे जे हॉस्पिटल येथे करण्यात यावी.तसेच सरकारी कर्मचारी व डॉक्टर यांच्यावर अद्याप कोणतीही कारवाई होत नसल्याने यासाठी उपोषण आणखी तीव्र करण्याचा इशारा यावेळी सुलोचना केदारे व त्यांचा नातू यांनी दिला आहे.



**उपमुख्यमंत्री ना देवेंद्र फडणवीस हे नगरला आले असता मा आ व राष्ट्रवादीचे नेते अरुणकाका जगताप यांनी त्यांचे स्वागत केले**

# पुस्तक दिनानिमित्त छावणी परिषदेचे सीईओ विक्रांत मोरे यांना पुस्तक भेट

**अहमदनगर । प्रतिनिधी**

सोशल मीडियाला कंटाळल्याने लोक पुस्तक वाचनाकडे वळत आहेत. वाचनासाठी खास वेळ देखील काढतात. चांगल्या पुस्तकाची चिकित्सा करतात आपले मत मांडतात. शहरासह गाव खेड्यात देखील वाचन संस्कृती बहरत आहे. हार, फुले, पुष्पगुच्छ कालांतराने सुकून जातात. मात्र त्या ऐवजी पुस्तके दिल्यास ती इतरांचे आयुष्य आनंदाने फुलवून टाकतात. त्यांचे विचार समृद्ध करतात, असे प्रतिपादन स्नेहबंध सोशल फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांनी केले.

जागतिक पुस्तक दिनानिमित्त डॉ. उद्धव शिंदे यांनी भिंगार छावणी परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विक्रांत मोरे यांना पुस्तक भेट दिले. त्यावेळी ते बोलत होते. डॉ. शिंदे म्हणाले,



अवांतर पुस्तक वाचनाकडे वळावे यासाठी संस्थेच्या, शासनाच्या तसेच दानशूर व्यक्तींच्या माध्यमातून गावागावांत ग्रंथालय उभारण्यात आले आहेत. यामुळे गावागावांत वाचन संस्कृती वृद्धिंगत होत आहे. ही बाब निश्चित स्वागतार्ह आहे. यातून समाज अधिक सजग व प्रगतिशील होण्यास गती मिळेल.

## आदर्श लोकप्रतिनिधी, खासदार आपण दिल्लीला पाठवायचा आहे

# डॉ.सुजय विखे पाटील यांचे माजी मंत्री शिवाजीराव कर्डिले यांच्याकडून कौतुक

**अहमदनगर । प्रतिनिधी**

मागील पाच वर्षात लोकसभा मतदार संघाता चेहरा मोहरा बदण्याचा प्रयत्न खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी केला. केंद्र सरकारच्या विविध योजनांचा लाभ सामान्य मानसापर्यंत पोहचविण्यासाठी केलेले यशस्वी प्रयत्न खुप महत्वपुर्ण ठरल्याचे गौरवोद्गार माजी मंत्र तथा जिल्हा बँकेचे चेअरमन शिवाजीराव कर्डीले यांनी काढले.

महायुतीचे उमेदवार खा. डॉ. सुजय विखे पाटील यांनी आपल्या निवडणुक प्रचारार्थ बाबळे वाडी, वरशिंदे, ताहाराबाद, गाढकवाडी, म्हैसगाव, कोळेवाडी, शेरीचिखलठाण, दरडगावथडी या गावांमध्ये मतदारांच्या गाठीभेटी घेतल्या निवडणुकीतील आपली भूमिका स्पष्ट केली. केंद्र सरकारने मागील १० वर्षात घेतलेल्या निर्णयांची माहिती देऊन, यावेळेस पुन्हा नरेंद्र मादी यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांना विजयी करण्याचे आवाहन महायुतीच्या नेत्यांनी केले आहे.

लोकसभेचे खासदार डॉ. डॉ. सुजय विखे पाटील यांनी गेल्या पाच वर्षांत केलेल्या विकासकामांच्या जोरावर नगरकरांच्या मनात आपली प्रतिमा निर्माण केली आहे. त्यांना जिल्ह्याच्या प्रश्नांची जाण आहे. जिल्ह्यातील तरुणांच्या रोजगारासाठी नगर तालूका तसेच श्रिगोंदा येथे औद्योगिक वसाहत निर्माण करण्यासाठी जाग उपलब्ध करून देण्यासाठी त्यांनी यशस्वी प्रयत्न केले आहेत. यामुळे येणाऱ्या उद्योगांमुळे रोजगाराच्या मोठ्या संधी निर्माण होतील असा विश्वास माजी मंत्री कर्डिले यांनी व्यक्त केला.





अहिल्यानगर मतदारसंघांतील जनतेने खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांना पाठबळ देण्याचा निर्णय घेतला आहे. डॉ. विखे पाटील यांच्या विजयामुळे पुन्हा एकदा नरेंद्र मोदी यांचा पंतप्रधान होण्याचा मार्ग अधिक बळकट होईल असा विश्वास व्यक्त करून या विभागाच्या विकासासाठी पुन्हा एकदा महायुतीला आवाहन माजी मंत्री कर्डिले यांनी केले. देशाचे यशस्वी पंतप्रधान मा.श्री. नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्त्वाखाली काम करताना गेल्या ५ वर्षात मोठ्या प्रमाणात विकासकामे केली. या ५ वर्षात लोकांनी दाखवलेला विश्वास सार्थ ठरवण्याचा प्रयत्न केला आणि गेल्या ५ वर्षांचे प्रगतीपुस्तक आज जनतेसमोर ठेवण्याचे काम करतोय, असे यावेळी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी सांगितले. तसेच आता लोकांनी ठरवायचे आहे, की भविष्यात आणखी कशा पद्धतीने विकास हवा आहे, असे आवाहन केले.यावेळी उपस्थित नागरिकांसमोर गेल्या ५ वर्षात लोकसभेत केलेल्या कामांचे जनतेसमोर सादरीकरण करत कामांची सखोल माहितीही डॉ. विखे यांनी दिली. जिल्ह्यात सर्वाधिक विकास कामे महायुतीच्या काळात झाल्याचे त्यांनी सांगितले. त्याच बरोबर पंतप्रधान मोदी यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्याला सर्वाधिक निधी मिळाल्याचा उल्लेख त्यांनी केला.येणाऱ्या काळात जिल्ह्यातील तरूणांना कामासाठी बाहेर जावे लागणार नाही यासाठी आपले विशेष प्रयत्न असतील. त्यासाठी तीन एमआयडीसीची कामे तयार असून लवकरत त्या सुरू केल्या जातील. त्याचबरोबर शेतकऱ्यासाठी बीयाण्यापासून बाजारपेढापर्यंत सेवा सुविधा निर्माण करण्यासा मानस त्यांनी यावेळी बोलून दाखविला. पंतप्रधान मोदींच्या हमीच्या जोरावर जिल्हा सुभलाम सुफलाम करणार असे त्यांनी यावेळी बोलताना सांगितले.

## उद्धव ठाकरेंसारखा रंग बदलणारा सरडा आपण पाहिला नाही:व्हिडिओ दाखवत एकनाथ शिंदेंचा हल्लाबोल

**छत्रपती संभाजीनगर–**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची स्तुती करणारे उद्धव ठाकरे आता त्यांच्यावर टीका करत आहेत, याचा मोबाईलवरील व्हिडिओ उपस्थितींना माईकवरून ऐकवत मुख्यमंत्री शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्यासारखा फास्ट रंग बदलणारा सरडा आपण पाहिला नाही, असे म्हणत जोरदार टोला हाणला. संदीपान भुमरे यांचा उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी ते छत्रपती संभाजीनगर शहरात आले होते. यावेळी गुलमंडी येथे झालेल्या सभेत त्यांनी उद्धव ठाकरे व आदित्य ठाकरेंवर हल्लाबोल केला.




शिंदे म्हणाले की, छत्रपती संभाजीनगरातील जनतेने शिवसेना, धनुष्यबाण आणि शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरेंच्या विचारावर प्रेम केले. गेल्यावेळी थोडी गडबड झाली, या वेळी दोघांच्या भांडणात तिसऱ्याचा लाभ होणार नाही. धनुष्यबाणच निवडून येणार, ४०० पारमध्ये संदीपान भुमरे मामा पाहिजेतच. असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.रॅलीनंतर गुलमंडी येथे झालेल्या सभेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे आणि महाविकास आघाडीचे उमेदवार चंद्रकांत खैरे यांच्यावर टीका केली. 'नो खैरे ओनली भुमरे.. एकच मामा भुमरे मामा' या घोषणांचा उल्लेख करत जालन्यात रावसाहेब दानवे आणि संभाजीनगरातून भुमरे लोकसभेत निवडून गेले पाहिजे, असे आवाहन देखील त्यांनी केले.मुख्यमंत्री शिंदे पुढे म्हणाले की, रोटी, कपडा, मकान देणारे आपले पंतप्रधान आहेत. भ्रष्टाचाराचा एकही शिंतोडा त्यांच्यावर नाही, ते बेदाग आहेत. बाप एक नंबरी, तर बेटा दस नंबरी असल्याचे म्हणत आदित्य ठाकरे यांच्यावर शिंदेंनी निशाणा साधला. मी मुख्यमंत्री झाल्यापासून त्यांना पोटशूळ उठला आहे. भुमरेंचा फॉर्म भरायला एवढ्या संख्येने तुम्ही आलात, त्यामुळे त्यांचा विजय पक्का आहे, असा दावा देखील शिंदे यांनी व्यक्त केला.लोकसभेच्या छत्रपती संभाजीनगर मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार संदीपान भुमरे यांनी मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. या वेळी क्रांती चौक ते गुलमंडीपर्यंत रॅली काढण्यात आली होती. यात केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड, रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे, गृहनिर्माण मंत्री अतुल सावे, अल्पसंख्याक विकास व पणन मंत्री अब्दुल सत्तार, दादा भुसे, आमदार हरिभाऊ बागडे, संजय शिरसाट, प्रदीप जैस्वाल, प्रशांत बंब, रमेश बोरणारे यांच्यासह महायुतीचे आमदार, नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने हजर झाले होते.मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मराठा आंदोलनातील नेते तथा लोकसभेसाठी इच्छुक असलेले विनोद पाटील यांची त्यांच्या घरी जाऊन भेट घेतली. विनोद पाटील यांनी काल अपक्ष म्हणून लढणार नसल्याचे सांगत माघार घेतली होती. त्यामुळे शिंदे यांनी त्यांची भेट घेतल्याने जिल्ह्यातील मतदानाचे गणित बदलू शकते, असा अंदाज देखील व्यक्त केला जात आहे. तर भेटीनंतर विनोद पाटील माध्यमांशी म्हणाले की, माझ्या घरी मुख्यमंत्री भेटायला येणे ही आनंदाची गोष्ट आहे. या भेटीत कुठलीही राजकीय चर्चा झाली नसल्याचे देखील पाटील यांनी स्पष्ट केले.

## मोदींकडे मांडायला कोणतेच मुद्दे नाहीत:त्यांच्या भाषणात सतत माझ्यावर टीका असते–शरद पवार

**धाराशिव–**मोदी, अमित शहा यांचे भाषण ऐका, सर्वात जास्त माझ्यावर टीका असते. भाजपला त्यांचा पराभव आता स्पष्टपणे दिसतोय असा हल्लाबोल राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी केला आहे.



राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचा जाहीरनामा आणि प्रचारगीत आज प्रकाशित करण्यात येणार आहे. त्यापूर्वी धाराशिवमध्ये ते पत्रकारांशी संवाद साधत होते.यावेळी शरद पवार म्हणाले, ''मोदी असोत किंवा अमित शहा, त्यांच्या भाषणात सतत फक्त माझ्यावर, उद्धव ठाकरेंवर टीका असते. गेल्या १० वर्षांपासून ते सत्तेवर आहेत. त्या काळात त्यांनी काय केले? त्याचा लेखाजोगा त्यांनी आधी जनतेसमोर मांडायला पाहिजे, उगीच मागच्या गोष्टी काढू नये'' असे शरद पवार म्हणाले.पुढे शरद पवार यांनी मोदींवर टीका केली आहे. मोदींकडे मांडायला काही नाहीच, लोकांना सांगायला काही नाही म्हणून ते आमच्यावर आरोप करत आहेत. त्यांच्याकडे दुसरे काही उद्योग नाहीत. आता जनतेने मोदींचा पराभव करण्याचा निर्णय घेतला आहे असे पवार म्हणाले.दरम्यान, पवार साहेबांनी किती कोलांट्या उड्या मारल्या याचे व्हिडीओ दाखवले, तर अवघड होईल, असे म्हणत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शरद पवार यांच्यावर नुकतीच टीका केली. त्याला आता शरद पवार यांनी प्रत्युत्तर दिले आहे. फडणवीस काय म्हणतात त्याला अर्थ नाही. आपला पराभव होतोय हे आता त्यांच्या लक्षात येतंय असे पवार म्हणाले.यापूर्वीही शरद पवार यांनी भाजप सरकार आणि मोदी यांच्यावर अनेकवेळा निशाणा साधला होता. कालच सोलापूरच्या माढा लोकसभा मतदारसंघात महाविकास आघाडीची सभा झाली. यावेळी शरद पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा एक जुना व्हीडिओ दाखवला. शरद पवारांनी नरेंद्र मोदींचे जुनं भाषण ऐकले. गेले दहा वर्षे देशात भाजपकडं सत्ता आहे. मोदींच्या हातात देशाचा कारभार आहे. मात्र निवडणुकीआधी दिलेली आश्वासने पाळली गेली नाहीत. लोकांची फसवणूक सुरू आहे'', असे शरद पवार म्हणाले होते.

## परभणीतून निवडून आलो नाही तर संन्यास घेईल:महादेव जानकर

**परभणी–**परभणी लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार महादेव जानकर यांनी आज एक मोठी घोषणा केली आहे. परभणी लोकसभा मतदारसंघातील मतदारांनी मला आपलेसे केले आहे. मी जवळपास ९०% मतदार संघ फिरलो आहे. येथील नागरिक माझ्या पाठीशी आहेत. या लोकसभा निवडणुकीत माझी लीड साडेचार लाखाची राहील आणि जर परभणीतून निवडून आलो नाही तर मी संन्यास घेईल, अशी घोषणाच महादेव जानकर यांनी केली आहे. परभणी लोकसभा मतदारसंघात राष्ट्रीय समाज पक्षाचे महादेव जानकर यांच्या विरोधात महाविकास आघाडीचे बंडू जाधव यांच्यात लढत होत आहे. निवडणुकीच्या प्रचारादरम्यान महादेव जानकर यांनी ही घोषणा केली आहे.

सध्या शेतकऱ्यांचा मुलगा राज्याचा मुख्यमंत्री झाला आहे. तर माझ्यासारखा बहुजनांचा मुलगा खासदार झालेला उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांना देखावत नाही का? असा प्रश्न महादेव जानकर उपस्थित केला आहे. आदित्य ठाकरे तसेच उद्धव ठाकरे हे अशा प्रकारे माझ्यावर टीका करतील, अशी मला अपेक्षा नव्हती. मात्र आता त्यांनी टीका केली आहे. २६ एप्रिल नंतर राज्यातील ज्या लोकसभा मतदारसंघात निवडणूक होणार आहे, त्या लोकसभा मतदारसंघात उद्धव ठाकरे आणि महाविकास आघाडी विरोधात आपण रान पेटवणार असल्याचा इशारा देखील जानकर यांनी दिला आहे.परभणी लोकसभा मतदारसंघातील उद्धव ठाकरे गटाचे उमेदवार संजय जाधव यांच्या प्रचारासाठी उद्धव ठाकरे यांच्या सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेमध्ये उद्धव ठाकरे यांनी महादेव जानकर यांचे डिपॉझिट जप्त करा, असे आवाहन मतदारांना केले होते. उद्धव ठाकरे यांच्या या आवाहनाला महादेव जानकर यांनी आता प्रत्युत्तर दिले आहे.

दुसऱ्या टप्प्यातील मतदानाचा आज प्रचाराचा अखेरचा दिवस आहे. त्यामुळे सर्वच मतदारसंघात महायुती आणि महाआघाडीच्या नेत्यांच्या सभेचे आयोजन करण्यात आले होते. या मतदारसंघांमध्ये २६ एप्रिल रोजी मतदान होणार आहे. त्यामुळे आता प्रचाराच्या तोफा आज थंडावल्या आहेत.

## पंकजा मुंडेंनी बीडवर लक्ष केंद्रीत करावे:प्रीतम मुंडेंना नाशिकमधून लढवण्याच्या वक्तव्यावर छगन भुजबळांचा सल्ला

**नाशिक–**नाशिक लोकसभा मतदार संघातून प्रीतम मुंडे यांना उमेदवारी देईल, अशी घोषणा पंकजा मुंडे यांनी केली होती. त्यावर आता छगन भुजबळ यांनी पंकजांना सल्ला दिला आहे. पंकजा मुंडे यांनी बीड लोकसभा मतदारसंघात लक्ष केंद्रीत करावे, त्या तेथून निवडून येणे महत्त्वाचे असल्याचे छगन भुजबळ यांनी म्हटले आहे. नाशिकमध्ये उमेदवार नाही ही अडचण नाही तर जास्त उमेदवार आहेत, ही अडचण असल्याचे छगन भुजबळ यांनी म्हटले आहे. इतकेच नाही तर वंजारी समाजाचेही अनेक उमेदवार आमच्याकडे असल्याचा दावा भुजबळ यांनी केला आहे. ते आज नाशिकमध्ये पत्रकारांशी बोलत होते.

नाशिक लोकसभा मतदारसंघातून मला उमेदवारी मिळाली नाही, याबद्दल मी मुख्यमंत्र्यांना दोष देत नाही. कारण त्यांची देखील अडचण होती. हा त्यांचा पारंपारिक मतदारसंघ आहे. त्यांचा विद्यमान खासदार आहे. त्यामुळे त्यांची अडचण होती. त्यामुळे त्यांना दोष देण्यात काहीच अर्थ नाही. नाशिकप्रमाणेच ओबीसी आणि इतर समाज शिरूर मध्ये देखील आहे. त्यामुळे तुम्ही शिरूर लोकसभा मतदारसंघातून लढणार का? असा प्रश्न मुख्यमंत्र्यांनी मला विचारला होता. त्यांचे हे विचारणे सहाजिक होते. त्यांचा हेतू चांगला होता. मात्र, मी नाशिक लोकसभा मतदारसंघातच राहतो आणि हा माझा मतदारसंघ आहे. निवडणुकीला उभे राहायचे म्हणून मी कुठेही जाऊन उभा राहणारा नाही. त्यामुळे मी त्यांना नाकार दिला. मी काही नाशिकसाठीही टिकीट मागितलेले नव्हते. त्यामुळे मी कुठे जाऊन उभे राहण्याचा प्रश्नच उपस्थित होत नाही. त्यामुळे मी त्यांना नाकार दिला, असे देखील छगन भुजबळ यांना म्हटले आहे.राज्यभरात ओबीसी समाज आहे. त्यामुळे ओबीसी समाजाच्या रॅली दरम्यान अनेक ठिकाणी उभे राहावे, अशी मागणी करण्यात आली होती. मात्र, मी नाशिक मतदारसंघ सोडून कुठेही लढण्याचा प्रश्नच येत नाही. मी नाशिक ऐवजी शिरूर मधून लढण्यास तयार झालो असतो तर नाशिकचा तिढा सुटला असता, असे मुख्यमंत्र्यांचे प्रामाणिक मत होते. त्यामुळेच शिंदे यांनी मला फोन करून शिरूर मधून लढण्यासाठी विचारणा केली होती, असेही छगन भुजबळ यांनी सांगितले. मला नाशिक मधून उमेदवारी मिळाली असती तर निवडून आलो असतो, असा दावा देखील यावेळी छगन भुजबळ यांनी केला आहे.

# समाजासाठी काम करणाराला संपत्तीचा मोह नसतो;नीलेश लंके यांचे प्रतिपादन

**अहमदनगर । प्रतिनिधी**

समाजासाठी काम करणाऱ्या व्यक्तीला कधीही संपत्तीचा मोह नसतो. संपत्तीसाठी मी कधीही विचार केला नाही. समाजसाठी काम करणे हेच माझे उद्दीष्ट असल्याचे सांगत आ. नीलेश लंके यांनी गेल्या साडेचार वर्षात त्यांच्या कमी झालेल्या संपत्तीबददल तसेच वाढलेल्या कर्जाबाबत पत्रकारांशी बोलताना स्पष्टीकरण दिले.

आ. लंके यांनी आपला उमेदवार अर्ज दाखल केल्यानंतर निवडणूक आयोगाकडून जाहिर करण्यात आलेल्या त्यांच्या संपत्तीच्या विवरणात त्यांची संपत्ती कमी होऊन त्यांचे कर्जही वाढले असल्याची बाब पुढे आली. त्याबाबत पत्रकारांनी लंके यांच्याशी संवाद साधला असता त्यांनी त्यांची भूमिका स्पष्ट केली.

एकीकडे तुमची संपत्ती कमी होत असताना विरोधी उमेदवार डॉ. सुजय विखे यांच्या संपत्तीमध्ये मोठया प्रमाणावर वाढ झाल्याचे दिसून येते असा प्रश्न उपस्थित केल्यानंतर लंके म्हणाले, मी पहिल्या दिवसापासून सांगत आलो आहे की मी जे आजवर काही केले ते समाजसाठी केले आहे. स्वतःसाठी काहीच केले नाही. माइ-यावर आरोप झाले मात्र मी निवडणूकीचा अर्ज दाखल केल्यानंतर खरे सत्य बाहेर आले. समाजासाठी काम करणाऱ्या व्यक्तीला संपत्तीचा कधीही मोह नसतो. संपत्तीसाठी मी कधीही विचार केला नाही. समाजासाठी काम करणे हेच माझे उद्दीष्ट आहे. जनतेच्या सेवकाने प्रामणिकपणे काम केले पाहिजे या भावनेतून मी काम करतो.गेल्या पन्नास वर्षांपासून आम्ही राजकारणात आहोत. आमच्या संस्था आहेत, सहकारामध्ये आम्ही काम करतो त्यामुळे माझी श्रीमंती हा निवडणूकीचा विषय होऊ शकत नाही असे डॉ. सुजय विखे सांगतात या प्रश्नावर बोलताना लंके म्हणाले, त्यांची श्रीमंती सर्वांनाच माहीती आहे. मात्र ही निवडणूक धनशक्ती विरूध्द जनशक्ती



अशी झालेली आहे. सत्तेचा गैरवापर करणे, कार्यकर्त्यांवर दबाव आणणे असे प्रकार विखे यांच्याकडून सुरू असल्याचा आरोप लंके यांनी केला.गेल्या साडेचार वर्षात तुमच्या संपत्तीमध्ये घट झाली असून कर्जही वाढले असल्याबद्दल विचारले असता लंके म्हणाले, समाजासाठी काम करत असताना कर्ज वाढणारच आहे. इतरांप्रमाणे आमचे इन्कमींग सुरू नाही.

तुम्ही एक सामान्य उमेदवार असताना मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री नगरमध्ये येऊन तुमच्यावर टीका करतात त्याकडे कसे पाहता असे विचारले असता लंके म्हणाले, ते त्यांच्या राजकीय व्यासपीठावर येतात. त्यामुळे त्यांना टीका करणे क्रमप्राप्त असते असे लंके यांनी स्पष्ट केले.

तुमच्यावर दोन गुन्हे दाखल आहेत याची आठवण करून दिली असता लंके यांनी कशाचे गुन्हे आहेत हे तपासले का असा प्रतिप्रश्न केला. कांदा भावासाठी मी सरकारमध्ये सहभागी असतानाही आंदोलन केले होते. त्यामुळे माझ्यावर गुन्हा दाखल झाला आहे. मी विचार केला नाही मी सत्तेत आहे की नाही. सगळयात महत्वाचा प्रश्न माझा शेतकरी जगला पाहिजे असे लंके म्हणाले.डॉ. सुजय विखे यांनी अर्ज दाखल केल्यानंतर झालेल्या सभेनंतर गोपीनाथ मुंडे यांचे फोटो फिरविण्यात आले या प्रश्नावर बोलताना लंके म्हणाले, असे ढोंगी प्रेम कशाला दाखवता ? कार्यक्रम संपल्यावर मुंडे साहेबांचा फोटो लावणे हा ढोंगीपणा आहे. याआगोदर कधी मुंडे साहेबांचे नाव घेतले का ? बॅनरवर फोटो लावला का ? तुमचे मुंडे साहेबांवर प्रेम होते तर मग पाच वर्षात तुमच्या बॅनरवर मुंडे साहेबांचा फोटो हवा होता ना ? बाळासाहेब ठाकरे, गोपीनाथ मुंडे, आर.आर .पाटील, विलासराव देशमुख हे नेते होउन गेले. त्यांच्याविषयी मला नेहमीच आकर्षण राहिले आहे असल्याचे लंके यांनी सांगितले.सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी मी ही निवडणूक लढवत आहे. आज विरोकांकडून दादागिरीचे वातावरण निर्माण केले जात आहे. या दादागिरी, गुंडगिरीविरोधात आपण निवडणूक लढवित आहोत. मतदारसंघात पाणी, बेरोजगारी आदी प्रश्न आहेत. हे प्रश्न सोडविण्यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे लंके म्हणाले.

# एन ११ गजानन नगर येथील अतिक्रमणे निष्कासित

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

महानगरपालिका अतिक्रमण हटाव विभागा मार्फत आज हडको एन ११ येथील गजानन नगर परिसरातील रस्त्यावरचे एकूण १५अतिक्रमण निष्कासित करण्यात आले.

सौभाग्य मंगल कार्यालयापासून गजानन नगर कडे जाणाऱ्या रस्त्यावर अनेक नागरिकांनी पंधरा बाय पंधरा दहा बाय वीस दहा बाय दहा व पाच बाय पाच अशा लहान मोठ्या लोखंडी टपऱ्यांचे अतिक्रमण करून जवळच्या खुल्या जागेत भाजी मंडई भरविली जात होती. यामुळे परिसरातील नागरिकांना वाहतुकीसाठी रस्ता मोकळा मिळत नव्हता.सर्व भाजी विक्रेते सह टपरीधारक यांनी रस्त्यावर अतिक्रमण केल्यामुळे याबाबत मा. आयुक्त महोदय यांच्याकडे ऑनलाईन व लेखी तक्रार प्राप्त झाली होती त्या अनुषंगाने मा. अतिरिक्त आयुक्त संतोष वाहुळे तसेच उपायुक्त सविता सोनवणे यांनी गुरुवारी आणि शुक्रवारी या भागात पाहणी केली व सर्व व्यापाऱ्यांना अनधिकृत टपरी धारकांना व इतर अतिक्रमण धारकांची प्रत्यक्ष चर्चा करून त्यांना दोन दिवसाचा अवधी देऊन सर्व अतिक्रमण काढणे बाबत सूचना देण्यात आल्या होत्या.या सूचनेनुसार काही लोकांनी स्वतःहून अतिक्रमण काढून घेतले होते तर इतर पंधरा लोकांनी हे अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणे न काढल्याने आज महानगरपालिकेच्या वतीने जेसीबीच्या साह्याने हे अतिक्रमण निष्काशीत करण्यात आले.

यामध्ये कारवाई करत असताना सुरुवातीला किरकोळ स्वरूपाचा विरोध झाला परंतु नंतर त्याच भागातील ज्येष्ठ नागरिकांनी विरोध करणाऱ्यांना कारवाई बाबत समजावून सांगितले. ही कारवाई सर्वांसाठी चांगली आहे.अत्यावश्यक वेळी अग्निशमन व रुग्ण वाहिका येण्यासाठी रस्ता मोकळा मिळणार आहे. यांनतर लोकांनाही नंतर प्रशासनास सहकार्य केले व स्वतःहून आपल्या घरासमोरील ओटे शेड काढण्यासाठी मदत केली. आज सकाळी महापालिकेच्या जेसीबीच्या वतीने लोखंडी टपऱ्या, लोखंडी कपाटे व लोखंडी बॉक्स जप्त करण्यात आले. तर इतर नागरिकांनी फक्त आजूबाजूचे पत्रे काढले होते. शेड व. ओटे न काढल्यामुळे जेसीबीच्या साह्याने अतिक्रमण काढण्यात आले व रस्ता मोकळा करण्यात आला.सदर कारवाई गजानन नगर ते नवजीवन कॉलनी या रस्त्यावर प्रामुख्याने राबविण्यात आली आहे.इतर ठिकाणी ज्या नागरिकांनी रस्त्यावर अतिक्रमण केले आहे व अद्याप ही आपले अतिक्रमण स्वतः काढले नाही अश्या अतिक्रमण धारकांविरुद्ध याच ठिकाणी वरिष्ठांच्या आदेशानुसार बुधवारी किंवा गुरुवारी पुन्हा कारवाई करण्यात येणार आहे. तसेच एन ११ मुख्य रस्ता स्मशानभूमी जवळ असलेले अनधिकृत व्यवसाय करणारे ट्रॅक्टर रेती खडी यांच्या विरुद्ध ही कारवाई करून त्यांना हटविण्यात आले आहे. सदर कारवाई मा.आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांच्या आदेशानुसार मा. अतिरिक्त आयुक्त संतोष वाहुळे , उपायुक्त अतिक्रमण सविता सोनवणे, प्रभाग अधिकारी अशोक गिरी अतिक्रमण निरीक्षक सय्यद जमशेद ,यशोदा पवार, सौरभ खेडे ,अश्विनी कोथलवार जेसीबी चालक, माजी सैनिक यांनी कारवाई सहभाग घेतला अशी माहिती अतिक्रमण विभागाच्या वतीने देण्यात आली आहे.




# मनपा प्रियदर्शनी विद्यालयात समर कॅम्प मध्ये संगीत व नृत्यांमध्ये रमले विद्यार्थी व शिक्षक

## विल्यम शेक्सपियर यांच्या जन्मदिनानिमित्त इंग्रजी भाषा दिन साजरा

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

मनपा प्रियदर्शनी विद्यालयात आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत, उपायुक्त तथा शिक्षण विभाग प्रमुख अंकुश पांढरे, शिक्षणाधिकारी भारत तीनगोटे मुख्याध्यापक संजीव सोनार यांच्या मार्गदर्शनाखाली दि १५ एप्रिल पासून समर कॅम्पचे आयोजन करण्यात आले आहे.

महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना नवीन नावीन्य पूर्ण शिक्षण मिळण्यासाठी मा.आयुक्त महोदय नेहमी प्रयत्नशील असतात.या अनुषंगाने विद्यार्थ्यांसाठी दररोज विविध नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येत आहेत. आज काकासाहेब जाधव संगीत शिक्षक यांनी विद्यार्थ्यांकडून देशभक्तीपर व इतर गीते संगीताच्या तालावर म्हणून घेतले. काही विद्यार्थी व शिक्षकांनी काही गाण्यांवर नृत्य सादर केले. तसेच सीबीएसई च्या विद्यार्थ्यांना मनीषा पगडे यांनी मेडिटेशन, योगा व कवायत चे प्रशिक्षण दिले. मनीषा नगरकर यांनी विद्यार्थ्यांना हस्तकलेचे वेगवेगळ्या वस्तू बनविण्यास शिकवल्या. तेजस्विनी देसले यांनी पृथ्वी दिनानिमित्त



पृथ्वीचे परिवलन, परिभ्रमण,कालावधी, ऋतुचक्र दिवस-रात्र निर्मिती,ध्रुव, निळा ग्रह म्हणण्याचे कारण,जीवनमान असलेला ज्ञात असणारा एकमेव ग्रह,सूर्यमालेतील क्रमान ३ चा ग्रह,खडकाळ भाग असलेला सर्वात मोठा ग्रह,आकाराने क्रमांक ५ हे विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकाद्वारे शिकवले.त्यासोबत विल्यम शेक्सपियर यांच्या जन्मदिन व मृत्यू दिनानिमित्त साजरा करण्यात येणाऱ्या इंग्रजी भाषा दिवस यात शेक्सपियर मुळे नामशेष होणारे इंग्रजी शब्द आपल्या नाटकात वापरून पुनर्जीवित केलेल्या शब्दांची माहिती तसेच त्यांनी वापरलेले काही विशिष्ट फ्रेजेस याबद्दल विद्यार्थ्यांनी माहिती दिली.विद्यार्थ्यांनी प्रसिद्ध हॅम्लेट नाटकातील संवाद ही सादर करून दाखविले. मोनिका चव्हाण यांनी विद्यार्थ्यांचे बैठे खेळ घेतले. समर कॅम्प च्या यशस्वीतेसाठी रश्मी होनमुटे सुनीता जोशी, प्रतिभा गावंडे, संगीता चौधरी , परिश्रम घेत आहे

# डॉ.कल्याण काळे यांच्या मध्यवर्ती प्रचार कार्यालयाचे बुधवारी उद्घाटन

## माजी मंत्री अमित देशमुख यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती राहणार

**जालना । प्रतिनीधी**

जालना लोकसभा मतदार संघातील इंडिया(महाविकास)आघाडीचे उमेदवार डॉ.कल्याण काळे यांच्या जालना येथील मध्यवर्ती प्रचार कार्यालयाचे उद्घाटन दि.२४ एप्रिल बुधवार रोजी सकाळी ११ वाजता राज्याचे माजी मंत्री आ.अमित देशमुख यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

जालना शहरातील जुना मोंढा गेटसमोर असलेल्या शाम लॉज जवळ प्रथम मध्यवर्ती प्रचार कार्यालयाचे उद्घाटन आणि त्यानंतर जुना मोंढा घड्याळ घर परिसरात प्रचार सभा आयोजित करण्यात आली आहे.या कार्यक्रमास राज्याचे विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे,विधान परिषदेचे सभागृह नेते बाळासाहेब थोरात,राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते आ.रोहित पवार यांची विशेष उपस्थिती राहणार असून प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते माजी मंत्री आ.राजेश टोपे,आ.कैलास गोरंटयाल,माजी आमदार तथा जिल्हा प्रभारी



नामदेवराव पवार,माजी मंत्री तथा निरीक्षक अनिल पटेल,आ.राजेश राठोड,जालना जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष राजाभाऊ देशमुख,शिवसेना उबाठा पक्षाचे जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर,जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष अनिरुद्ध खोतकर, माजी आमदार शिवाजीराव चौथे,सुरेशकुमार जेथलिया,चंद्रकांत दानवे,संतोष सांबरे,राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ.निसार देशमुख,शिवसेना उबाठा पक्षाचे जिल्हाप्रमुख ए.जे.बोराडे,राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस एकबाल पाशा,जालना शहर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष शेख महेमुद, माजी नगराध्यक्ष बबलू चौधरी,राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष नंदकिशोर जांगडे,आपचे जिल्हाध्यक्ष संजोग हिवाळे,सपाचे जिल्हाध्यक्ष शेख नबी शिपोरकर,संभाजी ब्रिगेडचे प्रदेश पदाधिकारी संतोष गाजरे, सिटुचे ज्येष्ठ नेते कॉ.अण्णा सावंत,मारोती खंदारे,शरद पडोळ,साईनाथ चिन्नादोरे,आरजेडीचे जिल्हाध्यक्ष सय्यद जावेद,शिवसेना शहरप्रमुख बाला परदेशी,राष्ट्रवादी यु.काँ.शहराध्यक्ष राजेंद्र जाधव,अनिल मिसाळ यांची उपस्थिती राहणार आहे.या कार्यक्रमास महाविकास आघाडीचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि जनतेने मोठया संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन इंडिया(महाविकास) आघाडीच्या निवडणूक प्रचार समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# मनपा प्रियदर्शनी विद्यालयात समर कॅम्प मध्ये मल्लखांबाचे प्रशिक्षण

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**


छत्रपती संभाजी नगर महानगरपालिकेच्या मनपा प्रियदर्शनी विद्यालयात मा. आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांच्या निर्देशानुसार उप आयुक्त तथा शिक्षण विभाग प्रमुख अंकुश पांढरे ,
शिक्षणाधिकारी भारत
तीनगोटे ,मुख्याध्यापक संजीव सोनार यांच्या मार्गदर्शनाखाली दि.१५ एप्रिल पासून समर कॅम्पचे आयोजन करण्यात आले आहे.

यात विद्यार्थ्यांच्या दररोज वेगवेगळ्या ऍक्टिव्हिटी करून घेण्यात येत आहे.

दररोज चित्रकला, हस्तकला , स्टोरी टेलिंग, विविध देशी खेळ, फ्लेमलेस कुकिंग, पुस्तक वाचन या प्रकारे उपक्रम राबविण्यात येत आहे.

आज मनपा प्रियदर्शनी शाळेत विद्यार्थ्यांकडून मल्लखांब वर मनोरे उभारण्याचे प्रात्यक्षिक करून घेण्यात आले.

विद्यार्थ्यांना मल्लखाबंचे मार्गदर्शन प्रशांत जमदाडे व भरत पुसे हे करत आहे. शाळेमध्ये या



प्रकारे नाविन्यपूर्ण उपक्रम होत असल्यामुळे विद्यार्थी व पालक आनंदी आहेत या आनंदी वातावरणामुळे शाळेत विद्यार्थ्यांची प्रवेश संख्या वाढत आहे. समर कॅम्प यशस्वी करण्याकरिता तेजस्विनी देसले, रश्मी होनमुटे ,मोनिका चव्हाण, वंदना पवार, मनीषा नगरकर, स्मिता मुळे ,संगीता चौधरी, किरण पवार,बी आर राठोड हे परिश्रम घेत आहे.

# विनोद पाटलांनी घेतली उदय सामंत यांची भेट

**छत्रपती संभाजीनगर**–उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनंतर विनोद पाटील यांनी शिंदे गटाचे नेते उदय सामंत यांची भेट घेतली आहे. रात्री उशिरापर्यंत दोघांची बैठक झाली. यावेळी विनोद पाटील यांनी उमेदवार बदलावा असं म्हणत तातडीचा सर्वे करून मला उमेदवारी द्यावी अशी मागणी केली आहे.दरम्यान छत्रपती संभाजीनगर लोकसभा मतदारसंघात विनोद पाटील हे महायुतीकडून निवडणूक लढवण्यास इच्छुक आहेत. मात्र शिवसेनेने इथे संदीपान भुमरे यांना उमेदवारी दिली आहे. फडणवीसांच्या भेटीनंतर बोलताना विनोद पाटील म्हणाले की, महायुतीकडून उमेदवारी मिळाल्यास मी ही जागा लढेन आणि नाही मिळाली तरीही ताकदीने जागा लढणार आहे असे त्यांनी स्पष्ट केले आहे.विनोद पाटील यांनी रात्री ९ वाजता उद्योग मंत्री उदय सामंत यांची भेट घेतली. दोघांमध्ये मध्यरात्री बारा वाजेपर्यंत चर्चा झाली. या भेटीनंतर आपण त्यांच्यासोबत सविस्तर चर्चा केली असून सकारात्मक चर्चा झाली आहे. माझे आणि विनोद पाटील यांचे २५ वर्षापासून घनिष्ठ संबंध आहे. आमच्या दोघांची चर्चा झाली ती मी मुख्यमंत्र्यांना सांगेन आणि त्यावर मुख्यमंत्री चर्चा करेल मुख्यमंत्री उद्या बुलढाणा जाण्यासाठी संभाजीनगर वरून जाणार आहे त्यावेळेस विनोद पाटील यांची भेट घेतील. संपूर्ण चर्चा मुख्यमंत्री यांच्यासोबत बसून चर्चा करतो आणि त्यानंतर उद्या मुख्यमंत्री विनोद पाटील यांची भेट घेतील आणि मार्ग निघेल, असे मंत्री उदय सामंत यांनी म्हटले आहे.

# २१० किलो प्रतिबंधित प्लॅस्टिक जप्त



**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

छत्रपती संभाजी नगर महानगरपालिका व महाराष्ट्र राज्य प्रदूषण मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आज झोन क्रं.०५ जाधवमंडी अंतर्गत नवीन मोंढा येथे सहा दुकानांची तपासणी करण्यात आली.यात दोन ठिकाणी कारवाई करण्यात आली.स्वस्तिक प्लॅस्टिक दुकान व स्थानिक विक्रेते यांचे कडून २१० किलो प्रतिबंधित प्लॅस्टिक मटेरियल जप्त करण्यात आले.

व संबंधितांकडून १६०००/- दंड वसूल करण्यात आला.

सदर कारवाई मा.आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांच्या आदेशानुसार व उप आयुक्त तथा घनकचरा व्यवस्थापन कक्ष प्रमुख रविंद्र जोगदंड व सविता सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली नागरी मित्र पथकाचे प्रमुख प्रमोद जाधव,प्रदूषण मंडळाचे डॉ.स्नेहल कोशे, स्वच्छता निरीक्षक रेणुका गायकवाड,सौरव घोरपडे, प्रमोद बनकर,सुहास आगलावे, मित्र पथक कर्मचारी देविदास सुसर, अबाराव सोळुंके,दौलत म्हस्के ,संजय पवार आदी कर्मचारी उपस्थित होते.


# विभागीय आयुक्तांकडून महाराष्ट्र दिन पुर्वतयारीबाबतचा आढावा



**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

महाराष्ट्र दिनानिमित्त १ मे रोजी देवगिरी मैदान, पोलीस आयुक्त कार्यालय येथे ध्वजारोहणाचा मुख्य शासकीय कार्यक्रम होणार आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सबंधित विभागाने आपल्याला सोपवलेली जबाबदारी व्यवस्थितपणे पार पाडण्यासाठी समन्वयाने कामकाज करावे, अशा सूचना विभागीय आयुक्त मधुकर राजे अर्दड यांनी आज दिल्या.विभागीय आयुक्त कार्यालयात महाराष्ट्र दिनाच्या मुख्य शासकीय कार्यक्रमाच्या पुर्वतयारीची बैठक विभागीय आयुक्त मधुकर राजे अर्दड यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यावेळी कार्यक्रमाच्या आयोजनाबाबतची सविस्तर चर्चा झाली.बैठकीच्या प्रारंभी उपायुक्त जगदिश मिनीयार यांनी कार्यक्रमाच्या कामकाजाबाबत विभागनिहाय माहिती दिली. यावेळी जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, उपजिल्हाधिकारी प्रभोदय मुळे, मनपाचे उपायुक्त रणजित पाटील यांच्यासह पोलीस आयुक्त कार्यालय, सार्वजनिक बांधकाम विभाग, महानगरपालिका, प्रादेशिक परिवहन विभाग यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# मंथन प्रज्ञाशोध परीक्षेत कान्हेगांव शाळेचे ८ विद्यार्थी गुणवत्ता यादीत



**श्रीरामपूर । प्रतिनिधी**

नुकत्याच झालेल्या मंथन प्रज्ञाशोध परीक्षेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कान्हेगांवचे ८ विद्यार्थ्यांनी तालुकास्तरीय गुणवत्ता यादीत येण्याचा मान पटकावला आहे. कान्हेगांव ही श्रीरामपूर तालुक्यातील द्विशिक्षकी शाळा असून दरवर्षी केंद्रस्तरीय तालुकास्तरीय विविध गुणदर्शन स्पर्धा असो वा क्रिडा स्पर्धा, विविध स्पर्धा परीक्षा यामध्ये कान्हेगाव शाळेने उल्लेखनीय यश संपादन केलेले आहे. यावर्षी एकाच वेळेस इयत्ता चौथीचे ५ आणि इयत्ता तिसरीचे ३ विद्यार्थी असे एकूण ८ विद्यार्थी गुणवत्ता यादीत आले आहे.

इयत्ता चौथीतील अमृता ज्ञानेश्वर चौधरी द्वितीय, पूर्वा प्रकाश खरात तृतीय निखिल बाळासाहेब खरात चतुर्थ, ईश्वरी प्रमोद खरात आठवी, विश्वजीत अशोक चौधरी चौदावा क्रमांक. इयत्ता तिसरीतील कुमार अरुण खरात चतुर्थ, साईनाथ विवेकानंद खरात नववा, आराध्या निलेश खरात दहावा क्रमांक गुणवत्ता यादीत मिळवला आहे. या विद्यार्थ्यांना वर्गशिक्षिका श्रीमती रेहाना मुजावर शेख तसेच मुख्याध्यापिका श्रीमती वैशाली थोरात यांचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल पढेगांव केंद्राचे केंद्रप्रमुख श्री. राजूभाई इनामदार, शिक्षण विस्तार अधिकारी श्रीमती मंगल गायकवाड, श्री.संजीवन दिवे, गटशिक्षणाधिकारी श्रीमती साईलता सामलेटी यांनी अभिनंदन केले आहे. तसेच शाळा व्यवस्थापन समिती पदाधिकारी, ग्रामपंचायत पदाधिकारी,पालक,सर्व ग्रामस्थांकडून विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले आहे.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .